शिक्षण मंडळ, कराड संचालित

# पूर्व प्राथमिक शाळा

**ता. कराड, जि. सातारा**

**शिक्षक**

**सौ. कांचन प्रसाद उमराणी**

# नवोपक्रम

## माझी कल्पना (कल्पना विस्तार आधारित)

(मोठा गट)

**स्पर्धेचा गट**

पूर्व प्राथमिक गट

(गट क्रमांक १)

## स्पर्धक शिक्षक माहिती



शिक्षकाचे नाव - सौ. कांचन प्रसाद उमराणी
जन्मदिनांक - १९ ऑक्टोबर १९७७
वय - ४४ वर्ष
संपर्क क्रमांक - ८८५६९४६५१५
पत्ता - ३०८, सोमवार पेठ, कराड
ता. कराड, जि. सातारा
शाळा - शिक्षण मंडळ कराड संचालित,
पूर्व प्राथमिक शाळा कराड
**शाळेचा पत्ता - मंगळवार पेठ, कराड**

नवोपक्रम

**माझी कल्पना ( कल्पना विस्तार )**

**मोठा गट**

# अनुक्रमणिका


| अ. क्रमांक | लेखन मुद्दे | पान नंबर |
|---|---|---|
| १ | नवोपक्रम शीर्षक | १ |
| २ | स्पर्धक शिक्षक माहिती | २ |
| ३ | माझी कल्पना - उपक्रम माहिती | ४ |
| ४ | नवोपक्रम - गरज व महत्त्व | ५ |
| ५ | नवोपक्रम उद्दिष्टे | ८ |
| ६ | नवोपक्रम नियोजन | ११ |
| ७ | नवोपक्रमाचे फोटो | १५ |
| ८ | उपक्रमाबाबत प्रतिक्रिया | १६ |
| ९ | नवोपक्रम कार्यपद्धती | १८ |
| १० | नवोपक्रम यशस्विता व फलनिष्पत्ती | २० |
| ११ | समारोप | २१ |
| १२ | संदर्भ सूची | २१ |
| | | |

## माझा नवोपक्रम

# माझी कल्पना ( कल्पना विस्तार )

## माहिती

शिक्षण मंडळ, कराड संचालित पूर्व प्राथमिक शाळा या माझ्या शाळेतील मोठ्या गटातील विद्यार्थ्यांसाठी मी माझ्या कल्पनेतून **'माझी कल्पना ( कल्पना विस्तार )'** अशा प्रकारचा नवोपक्रम केला.

या उपक्रमात मी माझ्या छोट्याशा बाल विद्यार्थी यांचेसाठी त्यांच्या कल्पनांना उंच अशी भरारी मिळावी आणि त्यातून त्यांना जीवनातील आनंद देता यावा, त्यांच्या विचारांना वेगवान बनवणे, कल्पना करायला लावणे, माझ्या कल्पनांना त्यांनी नवीन पंख देणे आणि त्यांच्या कल्पनांना मला पंख लावायला मिळणे, विद्यार्थी भाषिक विकास साधता यावा व माझ्या चिमूकल्यांना त्यांच्या शंका व त्यांचे प्रश्न कसे बरोबर आहेत व विचारायलाच पाहिजेत यासाठी उद्युक्त करणे यासाठी केला हा नवोपक्रमाचा अट्टहास. म्हणूनच तर असा छोटासा प्रयत्न केला आहे.

**'माझी कल्पना ( कल्पना विस्तार )'**

विद्यार्थ्यांना फक्त तुला काय वाटते? तुला काय म्हणायचे आहे? तुला कसे वाटते? तू असतास तर काय केले असतेस? तुला काय करावेसे वाटले असते? तुला यात काय बदल पाहिजेल? घटना सांगून काय व कसे झाले असेल हे सांगायला लावणे, प्रश्न विविध चित्र दाखवून, घटना सांगून, अर्धी गोष्ट सांगून पुढील गोष्ट त्यांच्या वयानुसार व कल्पनेनुसार त्यांनी पूर्ण करणे, चित्र दाखवून गोष्ट सांगणे, गोष्ट सांगून प्रश्न विचारणे, वस्तु व गोष्ट यांची गोष्ट तयार करणे, चित्रातील व काल्पनिक गोष्टीतील व्यक्ति बाबत विशेष माहिती सांगायला लावणे अश्या विविध प्रकारे 'माझी कल्पना ( कल्पना विस्तार )' हा अभिनव असा उपक्रम दोन महिने केला. यासाठी कल्पना विस्तारावर आधारित छोटासा माझ्या कल्पनेतून अभ्यासक्रम तयार केला. या नवोपक्रमाचा विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम तयार करताना मला व माझ्या लाडक्या विद्यार्थ्यांना आपल्या कल्पनाद्वारे भाषिक विकासात भरारी मारता आली. विद्यार्थी तर या विषयात तरबेज झालेच, भाषा विकास माझ्या कल्पनेपालिकडे झाला. पालकांनी कल्पना हि केली नव्हती की आपली चिमुकली अशा प्रकारची कल्पना करू शकतात आणि शाळेतील बाई ही अशा नाविन्यपूर्ण भरलेल्या कल्पना आधारित विषय घेवून नवीन अध्यापन पद्धतीने अध्यापन करुन lockdown काळात ऑनलाइन शाळा असूनही विद्यार्थ्यांना शाळेची एक शिक्षिका शाळेशी जोडून ठेवू शकते आणि विद्यार्थी अशा तासिकांची आवर्जून वाट पाहतात.

खरे तर माझ्या कल्पनेतून विद्यार्थ्यांसाठी केलेला हा त्यांच्या कल्पनेला वाव देणारा, भाषिक विकास वाढवणारा हा 'माझी कल्पना' हा नवोपक्रम शिकवत असताना कधी विद्यार्थ्यांचा झाला हे कळलेच नाही..

म्हणून तर

माझी असणारी कल्पना विद्यार्थ्यांची झाली आणि आम्ही दोघांनी घेतलेली कल्पनांची उंच भरारी

म्हणजेच हा नवोपक्रम

## 'माझी कल्पना'

# नवोपक्रमाची गरज व महत्व

## उपक्रम यासाठी निवडला -

एखादी गोष्ट किंवा निर्मिती होती तीच मुळात एखाद्या कल्पनेतून.. हे अगदी खरे आहे आणि याचा प्रत्यय मला हा नवोपक्रम करताना आला. हा उपक्रम करताना मला हा उपक्रम म्हणजे माझ्या कल्पनेतून सुचलेली निर्मिती होईल असे वाटले. एक शिक्षिका म्हणून मी ही एक फक्त आणि फक्त कल्पनाच केली होती की आपण मुलांना पडणाऱ्या प्रशांना उत्तरे द्यायची किंवा त्यांच्या ज्या काही कल्पना असतील त्या सहज बोलताना जाणवतात अशा कल्पनांना भरारी द्यायची. छोट्या छोट्या पाहिलेल्या, न पाहिलेल्या, फक्त ऐकलेल्या, अस्तित्वात असलेल्या, अस्तित्वात नसलेल्या अशा खूप कल्पना मुले मांडतात. अशा प्रश्नांची/ कल्पनांची उत्तरे कशी द्यायची? कधी द्यायची? त्यासाठी काय करावे लागेल? त्यातून त्यांना काही देता येईल का? वास्तवाशी संबंध जोडून त्यांना योग्य मार्गदर्शन कसे करता येईल? यांचा विचार करता अभ्यासासोबत उपक्रम घेतला तर याबाबी सहज घेता येतील असे वाटले. लहान मुले ही खूप प्रश्न विचारतात. त्यांच्या प्रश्नांना म्हणाल तर काही अर्थ नसतो पण एक शिक्षक म्हणून व एक अध्ययनार्थी विद्यार्थी म्हणून विचार केला तर त्यांच्या प्रश्नांना खूप अर्थ असतो. अर्थ का असतो तर त्यांचा बौद्धिक विकास वाढ होत असतो, प्रत्येक गोष्टीत त्यांना जिज्ञासा असते. प्रश्न विचारून ते त्यांना असलेल्या शंका त्यांची उत्तरे शोधत असतात. हे माझ्या पाहण्यात आले. एक शिक्षिका म्हणून एक मात्र जाणवलेले होते की मुलांना खूप शंका आहेत व त्या अभ्यासाव्यतिरिक्त आहेत. त्यांच्या शंकांना आपण उत्तरे नाही दिली तर ते त्यांच्या कल्पना वापरतात व त्याची उत्तरे स्वत: शोधतात. ही उत्तरे मात्र योग्य असतील असे नाही. त्या कल्पना योग्य मार्गाने फुलवता येतील का? त्यांना त्यानीच केलेली कल्पना किती विविध प्रकारे पाहता येईल.. यासाठी लहान मुलांचे भावविश्व त्यांच्या कल्पनेतून फुलवून त्यांना आनंददायी व उपक्रमशील, कल्पनाशील बनवून काही निर्मिती करता यावी यासाठीच मी हा उपक्रम राबविला.. व मुलांच्या शैक्षणिक, भावनिक, मानसिक, बौद्धिक विकासासाठी त्यांच्या क्रियाशीलतेत वाढ करण्यासाठीचा केलेला उपक्रम... **'माझी कल्पना'**

## 'माझी कल्पना' चे वेगळेपण -

१) लहान मुलांना पडणाऱ्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रयत्न केला.

२) मुलांना प्रश्न विचारल्यावर प्रश्न का व कसा पडला हे आधी विचारल्यावर त्याच्या विचार करण्याची पद्धत लक्षात आली.

३) एखादा प्रश्न पडल्यावर एकदम उत्तर न देता त्याला विचार करायला भाग पाडले.

४) मुले एखाद्या प्रश्नांचे उत्तर त्यांच्या कल्पना वापरुन देत आहेत हे लक्षात आले.

५) अनेक विद्यार्थी त्यांच्या अनुभवावरून, घरातील परिस्थिति नुसार किंवा त्यांना मिळालेल्या प्रतिसादा नुसार उत्तरे देत होती.. किंवा कल्पना मांडत होती.

उदा. तुम्हाला एक काठी दिली आहे तर काय कराल ?

उत्तरे - शिक्षा देण्यासाठी, कुत्र्याला मारण्यासाठी, उत्तर चुकल्यावर मार देणे,खोटे बोलले तर मार देणे, घरातील मोठ्यांचे ऐकले नाही तर मार देणे.. उत्तर पाहिल्यास लक्षात आले की त्यांनी पाहिलेली आणि अनुभवलेली बाब ते सांगत आहेत..

६) हा उपक्रम पूर्ण झाल्यावर वरील प्रश्नाची उत्तरे मात्र कल्पना करून, निरीक्षण देवून मिळाली ती अशी होती.. आजीला चालण्यासाठी, झाडू बनवता येईल, झेंडा पकडण्यासाठी, झाडावरील फळे काढण्यासाठी, पूल तयार करण्यासाठी, खेळ खेळणीसाठी, अंध व्यक्तीला देण्यासाठी

असा बदल होताना दिसला.

७) कल्पना करू लागली. कल्पना मांडू लागली. कल्पना प्रत्यक्षात उतरू लागली.

८) प्रश्न विचारण्याला मर्यादा नव्हत्या.. तश्या कल्पना करण्याला हि मर्यादा ठेवल्या नव्हत्या.

९) सुरुवातीला प्रश्न विचारत होती. उत्तरे मी देत होते. हळूहळू प्रश्न विद्यार्थी विचारत होते उत्तरे सहकारी विद्यार्थीच देत होते.

१०) शब्द/ चित्रावरून कल्पना तेच मांडत होते.. अयोग्य - योग्य समजू लागले.

११) अर्धी गोष्ट कल्पना करून ते पूर्ण करत होते.

१२) शब्द भांडार वाढत होते. भरभरून बोलत होती. आनंद घेत होती.

१३) सुरुवातीला सरळ साधी कल्पना मांडणारे माझे विद्यार्थी कल्पनांची भरारी मारू लागले.

१४) नवीन काहीतरी सुचू लागले.. त्यातून हळूहळू निर्मिती होऊ लागली..

१५) पालकांशी संवाद वाढला .. पालक मुलांच्या प्रश्नांना प्रतिसाद देवू लागले.. मुलांचे भावविश्व बहरले.

१६) भावनात्मक, मानसिक विकास अत्यंत वेगाने झाला.

१७) लेखन व वाचन याआधी बोलणे या प्रकारे भाषिक विकास झाला..

१८) कल्पना विस्तार करू लागल्यामुळे विनोद निर्मिती होऊ लागली. विनोद कळू लागले.

Lokdown मध्येही मुलांचा कल्पना विस्तार ऐकून घरातील वातावरण आनंदी व हास्याने भरलेले राहू लागले.

१९) आनंददायी व वयानुसार, आवडेल असे, मोकळेपणाने आपले मत मांडता येऊ लागले. आपले कोणीतरी ऐकत आहे व प्रतिसाद देत आहेत हे पाहून अध्ययनातील सहभाग वाढला.

२०) कल्पना करत - करत वास्तवतेशी संबंध लावू लागले.

२१) मागील वर्षी लाजणारी-बुजणारी, पुढे न येणारी ही मुले ऐकत ऐकत कधी सहभागी होऊन बोलू लागली. हे कळलेच नाही.

२२) मुलांना का? कसे? कधी? कोणी? यातील फरक लक्षात येवू लागला. व ती मांडू लागली.

२३) मुलांचे प्रश्न हे असेच ? तसेच ? कशामुळे ? कोणी ? यावरून ते असे असेल.. हे तसे असेल .. याच्या मागे असे झाले असेल.. अशा प्रकारे स्वयं योग्य दिशेने उत्तरे शोधू लागली.

२४) सामान्य ज्ञान वाढले..

२५) चित्रातून त्यांचा भावनिक विकास, सामाजिक विकास याच्या कक्षा रूंदवल्या असे पाहायला मिळाले.

## 'माझी कल्पना' अशा प्रकारे उपयुक्त ठरली..

अ) मुले घरात गुंतून राहिली.

आ) मुले निरीक्षण करू लागली. निरीक्षण शक्ति वाढली.

इ) वस्तूंचा उपयोग स्वकल्पनेप्रमाणे करू लागली. वस्तूंची नावे सांगताच - त्याच्या वापराबाबत कल्पना करू लागली. प्रत्येक वस्तूची मोडतोड न करता वापर करण्याकडे कल वाढला.

ई) मुलांच्या प्रश्नांकडे पालकांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलला.

उ) पालक व लहान मुले सुसंवाद होवून पालक मुलांच्या शंकाकडे अभ्यास म्हणून पाहू लागले.

ऊ) मुले जिज्ञासू झाली. प्रश्न विचारण्यासोबत प्रश्नांची उत्तरे शोधण्याकडे कल वाढला.

ऋ) चित्रातील योग्य अयोग्य का ते सांगू लागली.

ऌ) लहान असूनही अनेक अंगाने विचार करू लागली.

ऍ) आपल्या मित्राच्या कल्पना चूक की बरोबर ते सांगू लागली.

ऎ) मोबाईल पासून दुरावली.. स्क्रीन वेळ कमी झाला.. कार्टून पाहतानाही त्यांना त्यातील कल्पना कळू लागल्या. कार्टून मधील गोष्टी कल्पनाधारीत असतात हे लगेच लक्षात आले.

ए) संवाद कौशल्य वाढले. धीट झाली. शैक्षणिक प्रक्रियेत आनंदाने सहभागी झाली.

ऐ) नकार किंवा आपली कल्पना चुकल्यास योग्य कल्पना ऐकण्याची क्षमता प्राप्त झाली.. नकार पचविणे कळू लागले. आपल्या सोबत एकाच गोष्टीवर दूसरा ही मत मांडत आहे म्हणल्यावर ऐकून घेण्याची क्षमता वाढली. स्वत: माझे चूक की बरोबर हे सांगू लागली.

ऑ) प्राणी - पक्षी काय बोलत असतील - अशा प्रकारची कल्पना करून संवाद कौशल्य विकसित केली गेली.

ऒ) चित्रातील व्यक्ति काय म्हणत असतील? का असे म्हणत असतील? त्यांच्या चेहऱ्यावरील भाव पाहून त्यांच्या भावना सांगू लागली. त्यामुळे घरातील व्यक्ति पाहून समजू लागले त्यांच्या मनातील अवस्था.

ओ) सुख-दुख, आनंद- हसणे, रडणे व चिडणे-चिडवणे यामागील कारणे समजण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली.

औ) यामुळे मुले तासिकाला हजर राहू लागली.. उपस्थिती वाढली. गुणवत्ता वाढली.

अं) 'माझी कल्पना' या उपक्रमास मिळणारा प्रतिसाद पाहून शाळेतील विषयासाठी याचा फायदा करून घेण्यासाठी रोजचा शाळेतील अभ्यास केला तर बोलायला संधी मिळेल असे सांगितल्यामुळे मुलांचा शाळेचा अभ्यास वाढला.

अः) प्रत्येक विद्यार्थ्यांना त्यांची कल्पना मांडण्यास संधी दिली. त्यामुळे आपली/आपल्या पाल्याची कल्पना व दुसऱ्याची कल्पना/ विचार करण्याचा कल यातील फरक पालक व विद्यार्थ्यांना कळला. परिणामत: मलाही प्रत्येक विद्यार्थ्याची कल्पना शक्ति /विचार क्षमता, पालक मार्गदर्शनाचा परिणाम असे अनेक मुद्दे लक्षात घेता आले.

## नवोपक्रमाची उद्दिष्ट्ये

**नवोपक्रम यासाठी केला......**

1) लहान मुलांच्या कल्पना शक्तीला चालना व वाव देणे.
२) मुलांना वेगवेगळ्या पद्धतीने विचार करायला लावणे.
३) योग्य व अयोग्य ची समज देणे.
४) मुलांना कल्पना विस्तार करायला लावून त्यांच्या भावना समजून घेणे.
५) भावनांना मोकळी वाट करून देणे त्यातून त्यांच्या भावनिक व मानसिक क्षमता लक्षात घेणे.
६) मुलांची निरीक्षण शक्ति वाढवणे.
७) मुलांना विचार करायला प्रवृत्त करणे.
८) मुलांना उत्स्फूर्त बोलण्यास प्रवृत्त करणे.
९) संवाद कौशल्य वाढविणे.
१०) त्यांना सुचलेल्या बालसुलभ कल्पनांचा आनंद त्यांनाच देणे.
११) शोधक प्रवृत्ती निर्माण करणे.
१२) मुलांना वैचारिक पातळी सुधारण्यास मदत करणे.
१३) आनंददायी शिक्षण पद्धती अवलंबणे.
१४) मुलांच्या विचारांना व कल्पनांना गती देणे.
१५) कल्पना व वास्तविकता यांतील फरक समजावणे.
१६ ) मुलांना शाळा व अध्ययन यांची आवड लावणे.
१७ ) स्वयं शिक्षण मिळवण्यास प्रवृत्त करणे.
१८ ) टाळेबंदीची परिस्थिति लक्षात घेत पालक व मुले यातील संवाद वाढविणे.
१९ ) मुलांना मनोरंजन द्वारे अध्ययनाकडे वळवणे.

**'माझी कल्पना' या नवोपक्रमाचा - फायदा, कोणाला व कसा ---**

1) या उपक्रमाचा फायदा आमच्या विद्यार्थ्यांना नक्कीच झाला. कारण यातून त्यांची निरीक्षण शक्ति वाढली.

2) मुलांना दिलेली चित्रे, सांगितलेल्या घटना, पूर्ण - अपूर्ण गोष्टी व त्यातून मांडलेल्या कल्पना, साहित्य वापराबाबतच्या कल्पना याबाबत पालकांना प्रश्न विचारू लागली. मुलांची संवाद क्षमता वाढली.

३) विद्यार्थी एकमेकांना कल्पना कशी बरोबर व कशी चूक याबाबत सांगत होती.

४) मुले विचारत असलेल्या प्रश्नांना कटकट समजणारे पालक आता त्यांच्या प्रश्नांकडे उत्तर द्यावे लागेल म्हणून पाहू लागले.

५) मी सुद्धा मुलांना शिकवण्याआधी विविध प्रकारे कल्पना करून पाहत होते.. पण माझ्या वयाप्रमाणे तरीही मुलांच्या कल्पना या माझ्यापेक्षा १००% वेगळ्या असायच्या.

६) एखाद्या चित्रावर किंवा गोष्टीवर वेगवेगळ्या प्रकारे कल्पना मांडल्यामुळे कल्पनांची डिक्शनरी निघते की काय असे वाटू लागले. एक अपूर्ण चित्र पूर्ण करताना ३०-३५ कल्पना माझ्या समोर विद्यार्थी मांडत होते.
७) मी उपक्रम घेत असताना विद्यार्थी ही यामधून कल्पना आधारित प्रश्न विचारू लागले.. ज्याची उत्तराची अपेक्षा माझ्याकडून केली जावू लागली.
९) शाळेस कल्पक, हुशार, चौफेर विचार करणारे, संवाद साधणारे, आपले प्रश्न धाडसाने विचारणारे, कृतिशील प्रयोगशील, शोधक प्रवृत्तीचे विद्यार्थी मिळाले. तयार झाले.
१०) समाजासाठी सुजाण व कल्पक युवक होण्यासाठी छोटासा प्रयत्न करून माझ्याही कल्पना राबविताना नवीन नवीन शिकायला मिळाले. प्रत्येक वेळी आपण मुलांना सांगेल तसे बरोबर नसते. लहान मुले ही अतिशय योग्य ते म्हणणे मांडू शकतात याची जाणीव झाली.
११) पालकांना आपल्या पाल्याच्या प्रश्नांना उत्तरे देण्यास प्रेरणा मिळाली.
१२) शाळेतील विद्यार्थी टिकून राहिले. उपस्थिती वाढली. अभ्यास हसत खेळत करू लागली. तणावविरहित राहिली.
१३) कल्पक पिढी निर्माण झाली तर नाविन्याचा शोध नक्की लागेल. अशी अपेक्षा माझी या उपक्रमातून वाढली.

### उपक्रमातील कृती व विद्यार्थी विकास -

१) गोष्टी सांगितल्या - अ) एकाग्रता वाढली. ब) श्रवण क्षमता वाढली. क) गोष्टीवर आधारित प्रश्न व उत्तरे घेतली. ड) गोष्ट सांगताना पुढे काय होईल.. असे विचारल्यामुळे अध्ययनावर लक्ष वाढले. इ) गोष्टीमधून त्यांना संवाद साधण्यास प्रवृत्त केले.

२) चित्र दाखवले - अ) निरीक्षण क्षमता विकास अतिशय झाला. ब) छोट्या छोट्या गोष्टीचा संबंध सांगू लागली. क) घटना काय घडली असेल याची कल्पना सांगितली. ड) घटना कशामुळे घडली असेल याची ही कल्पना मांडली. इ) चित्रातील प्राण्यांचे हावभाव पाहून भावना मांडू लागले. ई) त्याचे वास्तवाशी संबंध मांडले.
३) अपूर्ण गोष्ट पूर्ण - पारंपरिक गोष्ट सांगून त्यावेळी असे का घडले असेल हे सांगत होते..(कल्पना करून) याच गोष्टी मध्ये बदल करून गोष्ट सांगितल्यास कल्पना बदल करून सांगत होते. त्याही पुढे जावून एखाद्या गोष्टीत असे व्हायला पाहिजे होते त्यामुळे असे झाले असते हे ही सांगत होते.. माझी चिमुकली मुले हे सगळे सांगताना मला अतिशय आनंद झाला होता की अशी अध्यापन पद्धती पुस्तकात अभ्यास म्हणूनच पाहिजे होती.
४) वस्तु ओळख - यामधून मला मुलांच्या भावना समजल्या. मुलांना वस्तूंचे अनेक उपयोग समजले. मुलांचा वस्तूंकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. वस्तूच्या मोडतोडीपेक्षा उपयोगाकडे कल वाढला. मुले इतरांचे म्हणणे ऐकून व समजून घेवू लागली. माझेच खरे यातून आपण ठरवूया याकडे मुलांची वाटचाल झाली. यामधून मुलांचा भावनिक विकास करता आला.
५) चित्रे पूर्ण करणे - मुले विचार करू लागली कल्पना करू लागली की चित्र कशाचे तयार होईल. आपले म्हणणे मांडू लागली. मला असे वाटले म्हणून मी हे उत्तर दिले असे ही म्हणू लागली.
५) घटना व प्रसंग - मुलांना घटना सांगणे. प्रसंगात काय घडले? का घडले? कसे टाळता आले असते? यासारख्या गोष्टींमुळे त्यांच्या विचारांना सुसंगपणा आला. इतर विद्यार्थ्यांची मदत घेवू लागले. परिस्थिती बदलली तर काय घडेल यावरून त्यांना अंदाज लावणे जमू लागले.

६) गप्पा गोष्टी - मुलांना गप्पा गोष्टींमधून तू तिथे असतास तर काय केले असतेस? एखाद्या प्रसंगात तुम्ही काय कराल? अशा गोष्टींमुळे मुले विचार करू लागली. त्यांचे विचार व्यक्त करू लागली. कल्पना करू लागली. त्यांचा विचार तर्कसंगत होवू लागला.

७)चित्रातून संवाद - चित्रातील प्राणी पक्षी काय बोलत असतील अशा प्रश्न विचारण्यामुळे स्वत:ला त्यांच्या जागी ठेवून विचार करू लागली. संवाद तयार करू लागली. एकाच वेळी अनेक संवाद सुचू लागले यातून त्यांचा भाषाविकास होण्यास मदत झाली.

८)जर-तर परिस्थिति- जर तर च्या प्रश्नातून मुलांना खूप कल्पना सुचू लागल्या. त्यातून आनंद घेवू लागली. त्यांच्या डोळ्यात स्वप्ने पाहू लागली. काही मुले कल्पना खऱ्या कशा होतात याबद्दल विचार करू लागली.कल्पनेतील आनंदातून मुले वास्तवात ज्ञान घेवू लागली.

९) गोष्टींवर आधारित प्रश्न विचारणे - यातून त्यांना नकळतपणे विचार करायला प्रवृत्त करणे.

१०) वस्तु दाखविणे किंवा चित्र दाखवून उपयोग सांगणे - त्यांच्या परिचयातील वस्तु दाखवून त्यांचा उपयोग विविध पद्धतीने कसा करता येईल याबाबत विचारणे यावरून मुले अनेक दृष्टीने विचार करू लागली. त्यांना आता आपल्या मित्रांचे विचार ही पटू लागले. ते शिक्षिकांसोबत, मित्रांशी संवाद साधू लागले.

११) घटना सांगणे - एखादी त्यांच्या वयाला साजेल अशी घटना सांगणे ती क्रमवार कशी घडली असेल याचा विचार करण्यास सांगणे उलट सुलट परिस्थितीत काय घडले असते ते विचाराणे यामधून विद्यार्थ्यांच्या विचाराला सुसंगतपणा येण्यास मदत मिळाली. विद्यार्थी अनेक प्रकारे विचार करू लागले.

या उपक्रमातून मुलांची कल्पनाशक्ती वाढेली, मुले स्वत; कल्पना करतील त्याचा विस्तार जमू लागेल. त्याचबरोबर या उपक्रमातून मुलांच्या विचारप्रक्रियेचा अभ्यास करता येईल. आधुनिक तंत्रस्नेही युगातील विद्यार्थ्यांना त्यांची निरागसता जपत पण तंत्रज्ञानाच्या सहाय्याने कसे विकसित करता येईल हे हि समजेल. प्ले ग्रुपमधून पुढे लहान गट व मोठ्या गटात जाणाऱ्या मुलांचे विचार व नवीन मोठ्या गटातच प्रवेश घेणाऱ्या मुलांची विचारप्रक्रिया यामधील तुलनात्मक अभ्यास करता येईल. त्यामधून त्यांना कसे विकसित करता येईल हे समजेल.

## नवोपक्रमाचे नियोजन

### 1] उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण :-

मुले घरात कंटाळत चालली होती. मुलांचा हट्टीपणा वाढत चालला होता. त्यांचा स्क्रीनसमोरील वेळ वाढत होता. त्यातून त्यांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता होती. शाळा बंद व घरातून बाहेर जावून खेळत नसल्याने 3 ते 6 वर्ष वयातील मुलांचा इतर लोकांशी समन्वय होत नव्हता. ऑनलाइन शाळा सुरू होती तरीही मुलांमध्ये उत्सुकता, जिज्ञासा जाणवत नव्हती. फक्त मोबाईल हातात किंवा टी. व्ही. सुरू व दिसेल ते पाहणे व ऑनलाइन गेम खेळणे एवढ्यातच त्यांचे विश्व सामावले होते. शिक्षकांचा पालकांशी जेंव्हा जेंव्हा संवाद होत असे तेंव्हा अनेक पालकांकडून असे समजले की मुले इतरांच्यात मिसळत नाहीत. चित्र काढवायस दिले तरी मोबाईलवर बघून काढतात. मनाने कशातच रमत नाहीत. उलटे बोलणे वाढले आहे. ऑनलाइन वर्गासाठी मुले पालकांसोबत बसतात पण नंतर काहीच मनाने करत नाहीत. अशा परिस्थितीत शाळा, शिक्षक आपले योगदान देत होते पण दोन वर्षाचा कालावधी शाळा व सवंगड्यांशिवाय या मुलांचा जाणार व त्यांचे निरागस बालपण, त्यांचे अनंत प्रश्न, त्यांचे भावविश्व, त्यांच्या कल्पनेतील पऱ्या, चांदोमामा, अनेक मुलांनी न पाहिलेल्या गोष्टी ज्या त्यांना गाणी, गोष्टीतून व खेळातून समजतात त्या राहणार व हि बालके पाहिलीत अंक व अक्षर ओळख याकडे जाणार हे पाहून मन अस्वस्थ होत होते. म्हणून खेळातून, गाणी, गोष्टीतून हा उपक्रम घेतला गेला. मुलांना त्यांच्या बलपणीचा आनंद देणे त्याचबरोबर हळूहळू वर्तन सुधारणे, स्क्रीनपासून लांब नेणे व त्यांच्या जिज्ञासू प्रवृत्तीला उत्तेजन देणे या हेतूने हा उपक्रम कारावास वाटला.

### 2] संबंधित व्यक्ति व तज्ञ व्यक्तीशी चर्चा :-

नियमित या संदर्भात मुख्याध्यापिका सौ. अमृता कुलकर्णी व इतर सहशिक्षिका यांच्याशी चर्चा होत होत्या. हा उपक्रम मी करण्याचे ठरविल्यानंतर सर्वांशी चर्चा केली. उपक्रम योग्य प्रकारे राबवित असताना नवोपक्रम पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री. विजय गजानन कुलकर्णी सरांचे मार्गदर्शनही मोलाचे ठरले.

पालकांनी मुलांना मोकळीकता द्यावी यासाठी ऑनलाइन तासिकाला मुलांना सहकार्य, उत्तरे सांगू नका असेही पालकांना सांगितले.

### 3] आवश्यक साधनांचा विचार :-

१) शाळा बंद व मुले -शिक्षक घरात आहेत हे लक्षात घेऊन मोबईलचा वापर कसा करावा याबाबत विचार केला. हे करत असताना स्क्रीन वेळ कमी ठेवणे पण ठरवलेले अध्ययन वा उपक्रम कसे करायचे यासाठी ऑनलाइन तासिका सोबत whats app चा वापर केला.

२) गोष्ट सांगताना वर्गात फळ्यावर चित्रे काढून ऑनलाइन तासिका मध्ये काय करायचे ते सांगितले. एकाच तासिकामध्ये सगळ्या मुलांना संधी देता येत नव्हती त्यामुळे मुलांचे गट करून अध्यापन कसे करावे याचाही विचार केला. मुले आणि फळा यांचा संबंध ठेवता आला. मुलांची एकाग्रता वाढविण्यासाठी फलकावर आकर्षक व रंगीत खडूने काढलेली चित्रे, त्यांच्या समोर चित्रे काढत असल्याने त्यांची एकाग्रता वाढत होती

३) मुलांची निरीक्षण शक्ति वाढविण्यासाठी मला पुस्तकातील चित्रांचा वापर या उपक्रमासाठी करता आला.

४) यू ट्यूब वरील गोष्टी दाखवल्या, लहान मुलांच्या उत्कृष्ट कलाकृती असणारी शॉर्ट फिल्म लिंक दिली. मात्र त्या अर्ध्यावर सोडून दिल्या व पुढील गोष्टीसाठी मुलांना विचाराला व कल्पनेला वाव दिला.
५) पालक घरात होते व त्यांचाही यात सहभाग घ्यावा म्हणून त्यांची मदत घेतली. कल्पना विस्तार इतर विद्यार्थी कसे करतात ते पाहून आपल्या पाल्याला कसे तयार करावे हे समजून आले.
६) किती वेळ घ्यावा व आपण कसे कमीत कमीत बोलायचे व विद्यार्थ्यांना अधिक कसे बोलता येईल यासाठी कोणती चित्रे वापरायची कोणती गोष्ट घ्यायची यांचे नियोजन करावे लागले.
७) मुलांना सोपे, आनंददायी, आणि मनोरंजक वाटेल असे अध्यापन करायचे याचाही विचार केला.

### ४) करावयाच्या कृतींचा क्रम :-

**पहिली पायरी :-** सुरुवातीला शिक्षक घरी व मुले पालकांजवळ अशी अवस्था. लहान मुले असल्यामुळे अध्ययन अध्यापनात अडथळे येण्याची दाट शक्यता वाटली. पण पालक घरी असल्यामुळे आपल्या पाल्याच्या अभ्यासाची काळजी १००%घेतील अशी खात्री वाटली. म्हणून पाठ्यपुस्तक अध्यापनासोबत कल्पना विस्तार या नवोपक्रमाची रचना केली. खरेतर हा उपक्रम स्पर्धेसाठी न करता आलेल्या अडचणीवर मात करण्यासाठी करण्यात आला आहे.

**दुसरी पायरी :-** टाळेबंदीच्या काळात विद्यार्थी शाळेपासून दूर जावू नये व अध्यापनात मनोरंजकता यावी यासाठी तयार केलेल्या कल्पना विस्ताराची मांडणी केली. विद्यार्थ्यांपर्यंत कशी पोहचवायची ,कशी घ्यायची, काय साध्य होईल, काहीच साध्य नाही झाले तर काय होईल याचाही विचार केला. गुगल मीट , Whats app व प्रत्यक्ष फोन द्वारे आपण हे करू शकतो याची खात्री पटली.

**तिसरी पायरी :-** गुगल मीट द्वारे पालकसभा घेवून पालकांशी सुसंवाद साधला. मुलांना मुक्त विचार करण्याची व मांडण्याची संधी द्यावी असे आवाहन केले. मुलांच्या शंका विचारलेले प्रश्न यासाठी पालकांनी सहकारी करावे असे सांगण्यात आले.

**चौथी पायरी :-** गुगल मीट द्वारे ऑनलाइन तासिका घेवून उपक्रमास सुरुवात केली. मुलांशी सुसंवाद साधला. मुलांनी आनंदाने सामील व्हावे म्हणून या उपक्रमाची कसलीही कल्पना त्यांना न देता त्यांच्याशी गप्पा मारत त्यांना मुक्त विचार व कल्पना करण्यास प्रेरित केले. यासाठी मी काही गोष्टी दाखवल्या व मुलांना समजावून सांगितल्या जेणेकरून मुलांना करायचे काय आहे हे समजण्यास मदत होईल.

**पाचवी पायरी :-** नवोपक्रमात घेतलेल्या कल्पनाविस्ताराबाबतच्या सर्व गोष्टी हळूहळू मुलांसामोर उलगडल्या. दाखवल्या. सांगितल्या. व त्याबाबत त्यांना बोलते केले. मुलांचे कल्पनाविस्तार पाहून हा उपक्रम करत असल्याचे अतोनात समाधान होत होते.

**सहावी पायरी :-** सुरुवातीला गप्पा गोष्टी करणारी मुले आता विचार करु लागली, विचार मांडू लागली. यातूनच त्यांच्या कल्पना करण्याला सुरुवात झाली.यासाठी थोडा प्रयत्न करावा लागला.

**सातवी पायरी:-** आता मुले आपल्या कल्पना मांडू लागली. त्यांच्या कल्पनांचा विस्तार होवू लागला. एकाच वेळी एकच बाब अनेक प्रकारे सांगू लागली. या पायरीत मात्र त्यांच्या कल्पनाविस्ताराला वाव मिळाला. आता त्यांना उपक्रमामध्ये आनंद मिळाला. कल्पना करण्याबरोबर उत्तरे देणे यापुढे जावून प्रश्न मांडणे ही होवू लागले.

**आठवी पायरी :-** मुलांच्या कल्पना विस्ताराला व त्यांच्या बाळबोध प्रश्नांना पालकांची साथ मिळू लागली. मुलांनी विचारलेल्या कसल्याही प्रश्नांना न टाळता पालक उत्तरे देवू लागले. मुलांच्या कल्पना पालक ऐकू लागले व तासिकेला मांडूही लागले.

### 5] उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :-

उपक्रम मुलांना आवडला. तसेच तो पालकांना हि आवडला. उपक्रम पूर्ण होत असताना मुलांमध्ये अनेक प्रकारे बदल दिसून आले.

1] मुलांची ऑनलाइन वर्गात हजेरी वाढली.

2] मुले उत्साहाने आई बाबांच्या मागे लागून वर्गात हजर राहू लागली. आई - बाबा अभ्यासात लक्ष देऊ लागले.

3] मुले उत्स्फूर्त बोलणारी दिसून आली.

4] शिक्षक विद्यार्थी यांचे दुहेरी अध्यापन अध्ययन सुरू झाले.

5] मुले आता कोणत्याही गोष्टीचे निरीक्षण करू लागली.

6] मुले घडलेल्या घटनेचा अंदाज लावू लागली.

7] मुले पूर्ण वाक्यात बोलू लागली.

8] वर्गात कधीच न बोलणारी मुले उत्तम संवाद साधू लागली.

9] मुलांमध्ये मैत्री झाली. आपापसातच कल्पना सांगू लागली.

10] एकमेकांच्या प्रश्नांचे त्यांच्यापरीने समाधान करू लागली.

11] मुले त्यांच्या मनाच्या कल्पना रचू लागली.

12] त्यांच्या भावविश्वातील अनेक प्रश्न विचारू लागली. त्यांची उत्तरे शोधू लागली.

13] मुलांना कल्पना व वास्तव याचे भान आले.

14] त्यांचे शब्दभांडार वाढले.

15] मुलांचा भाषाविकास होण्यास मदत झाली व संवाद कौशल्यही वाढले.

16] मुले मनाने गोष्ट रचण्याचा प्रयत्न करू लागली.

17] नवोपक्रमच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त करू लागली.

18] मुलांची आता ज्ञानलालसा वाढली.

19] त्यासाठी शाळा सुरू होण्याची व शाळेत येण्याची ओढ निर्माण झाली.

२०] मुलांना वेगळ्या पद्धतीने अध्यापन केल्यामुळे बाई आवडू लागल्या. बाई आवडल्या की अभ्यास घेणे सोपे जाते.

## कार्यवाहीचे टप्पे

वेळापत्रक

| क्र. | दिनांक | वार | घटक | उपघटक | उद्दिष्ट्ये |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६/९/२०२१ | सोमवार | गोष्ट | मिडस राजा | उत्सुकता वाढविणे |
| २ | ८/९/२०२१ | बुधवार | गोष्ट | श्रीकृष्ण व सुदामा | कल्पनेत रममाण करणे. |
| ३ | १५/९/२०२१ | बुधवार | गोष्ट | शेळीची | अडचणीतून मार्ग काढणे |
| ४ | १७/९/२०२१ | शुक्रवार | गोष्ट | शेतकरी व तीन मुलगे | गोष्टीवर आधारित प्रश्न, विचारांना चालना देणे |
| ५ | २०/९/२०२१ | सोमवार | गोष्ट | देव व राक्षस | कल्पना विकास, आधारित प्रश्न,संस्कार |
| ६ | २२/९/२०२१ | बुधवार | गोष्ट | ससा कासव | परिस्थितीत बदल, वेगळा विचार करणे. |
| ७ | २४/९/२०२१ | शुक्रवार | चित्राचे निरीक्षण | बारीक तपशील पाहणे. | शब्दभांडार वाढविणे, |
| ८ | २७/९/२०२१ | सोमवार | चित्र वर्णन | पूर्ण वाक्यात बोलण्याचा प्रयत्न | भाषाविकस करणे. |
| ९ | २९/९/२०२१ | बुधवार | गप्पागोष्टी | उत्स्फूर्त बोलणे | विचारांना गती देणे |
| १० | १/१०/२०२१ | शुक्रवार | गप्पागोष्टी | चौफेर विचार | विचार मांडणे जमणे. धाडस निर्माण होणे. |
| ११ | ६/१०/२०२१ | बुधवार | घटना | घटनेचा योग्य क्रम लावणे | सुसंगत विचार |
| १२ | ८/१०/२०२१ | शुक्रवार | रचना करणे | फुले, बिया यांची रचना करणे | आपली कल्पना कृतीत उतरणे |
| १३ | १२/१०/२०२१ | | रेड डे | लाल रंगाच्या वस्तु पाहणे ,रचना करणे | निरीक्षण करणे , कल्पना विकास,कृती करणे |
| १४ | १८/१०/२०२१ | सोमवार | चित्रातून गोष्ट पूर्ण करणे | कबुतर व मुंगी,कुत्रा व मांजर आणि तिची पिल्ले | कल्पना विकास होण्यास मदत,विचारांना चालना |
| १५ | २०/१०/२०२१ | बुधवार | संवाद कौशल्य | चित्रातील पत्रांचा संवाद | कल्पनेतून आनंद |
| १६ | २२/१०/२०२१ | शुक्रवार | वस्तु दाखवणे | उपयोग सांगणे | विविधता,उत्स्फूर्तता,बोलण्यास प्रोत्साहन देणे,वेगळा विचार करणे, शब्दसंपत्तीत वाढ. |
| १७ | २५/१०/२०२१ | सोमवार | कल्पनेतील आनंद | चित्रातून, कृतीतून. | निखळ आनंद, रममाण होणे, |
| १८ | २६/१०/2021 | मंगळवार | कल्पनेतील आनंद | जर-तर च्या कल्पनेतून | मनोरंजनातून [illegible] सुचणे. |
| १९ | २७/१०/२०२१ | बुधवार | असच का? | प्रश्न निर्मिती | निरीक्षणातून प्रश्नाकडे |
| २० | २८/१०/२०२१ | गुरुवार | प्रश्न मुलांच्या मनातील | धाडसाने प्रश्न विचारणे | धाडस वाढविणे, कल्पना विस्तार, संवाद साखळी सुरू करून देणे |
| २१ | २९/१०/२०२१ | शुक्रवार | प्रयोग विज्ञानाचे | छोटे छोटे प्रयोग | प्रश्नातून कृतीकडे, विचार करायला लावणे,निरीक्षण |
| २२ | ३०/१०/२०२१ | शनिवार | एक नवी कल्पना | मुलांची कल्पना | कल्पनाविस्तार |
| | | | | | |
| | | | समारोप | | संवाद पालकांशी |

2021/11/23 20:52

### उपक्रमासाठी इतरांची मदत

1] संस्थेचे पदाधिकारी अध्यक्ष श्री. बाळासाहेब कुलकर्णी, सचिव श्री.चंद्रशेखर देशपांडे व श्री.राजेंद्र लाटकर यांनी परवानगी दिली. गुणवत्ता वाढ करत असल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.

3] सर्व सहशिक्षिका यांच्याशी विचार विनिमय करता आला.

4] पालकांचे व विद्यार्थी सहकार्य उत्तम मिळाले.

6] राज्य स्तरावरील २०२०-२१ नवोपक्रम स्पर्धेतील द्वितीय क्रमांकाचे पुरस्कार प्राप्त श्री. विजय गजानन कुलकर्णी सर यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनामुळे मी हा उपक्रम नवोपक्रम लिहू शकले.

# उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे

(मुलांना अशी चित्रे दाखवून त्यावर चर्चा,निरीक्षण,संवाद,कल्पना करायला प्रवृत्त केले.)



मुलांनी स्व कल्पनेतून काढलेले चित्र



तुम्ही वाघ असता तर काय केले असते?



कुत्रा घरात कशासाठी पाहत आहे?

मांजराला काय वाटते आहे?

मांजरची पिल्ले इतकी निवांत का खेळत आहेत ?



चित्र पाहून काय वाटते?




दोन मुलींमधील काय घटना घडत आहे?

तुमच्या बाबतीत असे घडले आहे का?

तेव्हा तुम्ही काय केले असते?

# उपक्रमाबाबत आलेल्या प्रतिक्रिया

## १) सहकारी शिक्षिका

माझी कल्पना हा वर्ग छान झाला. वेगवेगळे प्रयोग पहायला मिळाले. छान वाटले. गोष्ट रंगवून सांगितल्या मुळे सुंदर वाटली. मस्त. 👌👌

सौ. देशपांडे बाई

## २) मुख्याध्यापिका

## सौ. अमृता अवधूत कुलकर्णी

कांचन चे खरंच कौतुक आहे. तिने जो उपक्रम घेतला. मुलांना तर आवडला पण पालकांनाही आवडला. खूप एवढ्या कमी वेळात तयारी करून त्या करीता आपला वेळ देऊन उपक्रम घेतला त्याबद्दल तिचे खूप खूप कौतुक .

## ३) पालकांची प्रतिक्रिया

अ) बाईंनी घेतलेला माझी कल्पना हा उपक्रम अतिशय सुरेख झाला.मुलांच्या बुद्धीला चालना मिळेल असे नवीन प्रयोग पाहायला मिळाले.बाईंनी त्यात मुलांना सहभागी करून घेतले त्यामुळे खूप छान वाटले.असेच उपक्रम सुरू राहोत.सर्व बाईंना खूप धन्यवाद

(ओजस नलवडे ची आई)

ब) तुम्ही जो उपक्रम राबावत आहात एक तासभर मुलांचा वेळ खरंच खूप छान जातो आहे. माझी मुलगी शिवानी जिला ऑनलाइन सेशनमध्ये आधीच्या शाळेमध्ये जिला बळजबरीने बसवावे लागत होते ती आता स्वत:हून एकटी बसण्यास तयार असते. जी तुम्ही सुरुवात केली आहे ती माझ्यासाठी नवीनच आहे आपले जे संस्कार आहेत आंघोळ केल्यानंतर देव व आईवडिलांना नमस्कार करणे श्लोक म्हणणे हे तुम्ही मुलांना करायला लावत आहात मुले ते आनंदाने करत आहेत. त्यांच्या विचारशक्तीला, कल्पनाशक्तीला वाव देणारे प्रश्न, गोष्टी अगदी त्यांचेशी एकरूप होवून सांगत आहात, त्यांना बोलायला उद्युक्त करत आहात ते खूप छानच आहे. मला हिची खूप काळजी वाटत होती की शिक्षणामध्ये तिला आवड आहे का नाही कारण आधी ती इंग्लिश मिडियमला होती आणि तिथे अभ्यास म्हणजे फक्त एक पुस्तकी आहे असे तिचे मत झाले होते. पण आता शिक्षण हे पुस्तकाबाहेरील आपण अनुभवतो त्या घंटनांमधून शिकता येते हे तिला समजायला लागले आहे. हि तर सुरुवात आहे तिला आता शिक्षणाची आवड निर्माण होवू लागली आहे. खूप छान पद्धतीने तुम्ही ते मुलांमध्ये रुजवात आहात त्याबद्दल तुमचे मन:पूर्वक आभार,अभिनंदन व खूप सारे कौतुक. धन्यवाद.

**(शिवानी राजे हिची आई)**

## पालक whats up वरून आलेली प्रतिक्रिया

सौ. उमराणी बाई यांचा अतिशय स्तुती उपक्रम आहे. बाई मुलांना एखादे चित्र दाखवतात व त्यावर व्यक्त व्हायला सांगतात म्हणजे या चित्रातील प्राणी पक्षी किंवा गोष्टीतील पात्रे मुलांशी काय बर बोलत असतील, संवाद साधत असतील असे विचारून बाई मुलांना विचार करायला प्रवृत्त करतात. किंवा त्यांना बोलते करतात मुलेही यावर खूप छान छान प्रतिक्रिया देत आहेत. अगदी बिनधास्त आपली मत व्यक्त करत आहेत. यातून त्यांना एखाद्या गोष्टीवरती किंवा घटनेवरती विचार करण्याची सवय लागते किंवा प्रेरणा मिळते. आणखी काही काल्पनिक प्रसंग बाई स्वत:हून मुलांना सांगतात किंवा तुम्ही तिथे असता तर काय केले असते असे विचारतात तेंव्हाही इतके हसत खेळत वातावरण असते की मुलांना आपण बाईंशी गप्पाच मारत आहोत असे वाटते त्यामुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला अगदी चांगला वाव मिळत आहे. सर्व मुले वेगळ्या वेगळ्या पद्धतीने विचार करायला लागली आहेत व त्यांचे स्वतंत्र विचार मांडत आहेत बाई हि त्यांना अगदी जोरदार प्रोत्साहन देतात व आणखी बोलण्यास किंवा विचार करण्यास प्रवृत्त करतात. मुलांना ऑनलाइन वर्गात हि आपले विचार मांडायला मिळत आहेत। बुद्धीला चालना मिळणारे असे खाद्य मुलांना वारंवार मिळायला हवे. माझ्या मते हा मुलांना बाईंच्याकडून मिळालेला दिवाळी बौद्धिक फराळच आहे. यातून मुलांचा भावनांक नक्कीच वाढत आहे. वर्ग फक्त पाठांतरचे किंवा अभ्यासाचे असण्यापेक्षा अशा वर्गात मुले जास्त रमत आहेत. गप्पागोष्टीमध्ये अगदी समरस होवून जात आहेत. मोठ्यानाही सुचणार नाहीत आशा भन्नाट कल्पना हि मुले सुचवत आहेत. मुलांचा भावनांक वाढवणे ही डिजिटल काळाची गरज आहे त्यासाठी शाळेकडून खूप चांगला प्रयत्न होत आहे. त्यासाठी आम्ही पालक म्हणून तुमचे खूप खूप आभारी आहोत. धन्यवाद.

( सुरभि कुंभार ची आई )

# नवोपक्रमाची कार्यपद्धती

**⁎ पूर्व स्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी -**

1] विद्यार्थी नियमित अभ्यासक्रमास कंटाळताना दिसले.

२] विद्यार्थी अनुपस्थितीत राहण्याचे प्रमाण वाढलेले दिसून आले.

३] अनुपस्थित विद्यार्थी पालक सातत्याने फोन करून आज काय शिकवले विचारत शिक्षक वैयक्तिक वेळ खूप जात होता.

४] whats app वरील अवलंबणे वाढले होते. त्यामुळे प्रत्यक्ष अभ्यास मुले करत की पालक ते काळात नव्हते.

५] मुलांशी संवाद कमी राहायचा ठराविक मुले उत्तर देत. भाषिक विकास भाषा शुद्धीकरण याकडे लक्ष राहत नव्हते.

६] पूर्व प्राथमिक गटासाठी अध्यापन प्रक्रियेत संवाद अत्यंत महत्त्वाचा आहे.

७] पालक शाळा सुरू करा मुले घरात त्रास देतात.. चिडखोर झाली आहेत.. असे पालक वर्गातून सुर येत होता.

८] मुलांचे मनोरंजन म्हणजे मोबाईल व कार्टून एवढेच झाले होते.. त्यांच्या बालप्रश्नांना उत्तरे देणे पालक टाळत होते. टाळेबंदीमुळे पालक मुलांना एवढा वेळ घरातच पाहून वैतागले होते. त्यांचे करायचे काय असे वाटत होते.

९] मुलांचे प्रश्न हे या वयात पडणारे असतातच ती त्यांची ज्ञान लालसा असते हे पालकांना सांगून उपक्रमात सहभागी करून घेतले.

१०] पालक मुलांना उत्तरे सांगत होती, अभ्यास पालक करून रिकामे होत होते. शिक्षक म्हणजे मी अभ्यास पूर्ण झाल्यावर शाबासकी देत होते. पण माझी शाबासकी नक्की कोणाला माझ्या विद्यार्थ्याला की त्याच्या पालकांना हे मला कळत नव्हते. ऑनलाइन तासिकेला पालक मागून उत्तरे देत होते. मुलांना येते की नाही माझे अध्यापन कसे होते हेच काळात नव्हते. माझे समाधान होत नव्हते. म्हणून माझे विद्यार्थी व मी शिक्षक म्हणून अध्ययन पद्धत बदलली.

११] या पद्धतीमुळे व विशेष तासिका, ठराविक विद्यार्थी, एक तासाची तासिका वेळ त्यामुळे प्रत्येकाला संधी मिळावी हा हेतू ठेवला.

**⁎ कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन :-**

१] विशेष तासिका असा उल्लेख केल्यामुळे उपस्थिती वाढली. ९०% राहिली.

२] मनोरंजन आधारित व परिक्षाविरहित असल्यामुळे, गुण नसल्यामुळे मुले तणाव रहित सहभागी होते.

३] प्रत्यक्ष तासिका असल्यामुळे पालक हस्तक्षेप नाहीच होऊ लागला. कल्पना या मुलांच्या होऊ लागल्या. उत्तरे बाल वयाप्रमाणे येवू लागली. जाणवू लागले.

४] वेगळेपणाणे केलेले अध्यापन व त्यातील मज्जा व आनंद सर्व पालक घरातून गहेवू लागले.

५] आपला पाल्य काय उत्तरे देईल यांकडेच पालकांचे लक्ष लागून राहिले. त्याने दिलेले उत्तर त्याबाबत घरात अर्थपूर्ण चर्चा करू लागले. जे अपेक्षित होते. सकारात्मक परिणाम झाला.
६] मुले धीट झाली. संवाद कौशल्य वाढलेच. पण अध्ययनातील गोडी ही वाढली.
७] विशेष तासिका वाट पाहू लागली. अधीरता वाढली.. सहभाग वाढला.
८] कल्पना मांडताना योग्य अयोग्य सांगू लागली. पालक समाधान वाढले.
९]घरात पालक असे मार्गदर्शन करू लागले.
१०] मुलांच्या प्रश्नाकडे कुतूहल म्हणून पाहू लागले.
११] मुलांना होणारा आनंद अवर्णनीय होता.
१२] मुलांचे धाडस वाढले.
१३] कोणत्याही घटनेला पळून जावू असे उत्तर देणारी दळवी नावाची विद्यार्थिनी आता मार्ग सुचवू लागली.
१४] मुले एकमेकांची मदत घेवू लागली.
१५] विद्यार्थी उत्तरे नोंद केली. मानसिक, बौद्धिक, भावनिक,सामाजिक अशी विभागणी केली. परिस्थितिनुसार व दिलेल्या उपक्रमनुसार उत्तरे कशी येतात हे पाहिले.

### * कार्यवाही करताना आलेल्या अडचणी :-

1] विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष परिसर दाखवणे किंवा निरीक्षणसाठी वाव असणारा निसर्ग दाखवणे जमले नाही. चित्रतूनच व व्हिडिओ मधून ते दाखवावे लागत होते.
2] ऑनलाइन वर्गामुळे वेळेची मर्यादा राहत होती. प्रत्येकाला त्याचा विचार सर्वांनी ऐकावा असे वाटत होते.
3] विद्यार्थ्यांना कल्पनेत रममाण होण्यासाठी वेळ अपुरा पडत होता. कारण त्यांना कल्पना सुचून त्याचा आनंद घेवून ती पूर्ण वाक्यात तयार करून सांगायची असे यासाठी जास्तीचा वेळेची आवश्यकता होती.शाळा सुरू झाल्यावर हि अडचण असणार नाही.मुलांना झाले होते. पण प्रत्यक्ष वर्गात मुले नव्हती ती ऑनलाइन होती. हि अडचण वाटली.
5] रेंज प्रॉब्लेम, स्क्रीन शेअर केलेली न दिसणे अशा अडचणी काही मुलांना जाणवल्या पण इतर मुलांनी त्यांना न दिसणाऱ्या चित्राचे वर्णन करून सांगितले देखील.
६] सुरुवातीला होणारा पालक हस्तक्षेप.
७] शाळेच्या वेळेनंतर होणारी तासिका - जादा तासिका. हि पालकांची अडचण होती.
८] पालक सातत्याने फोन करून विचारत हे उत्तर बरोबर होते की .. कल्पना होती हे सांगावे लागत.
९] ऑनलाइन तासिका हि अडचण सुरुवातीला. पण पर्याय नव्हता. म्हणून जमले ऑनलाइन.
१०] ऑफलाईन आणखीन आनंद मिळवता आला असता हे जाणवले.

### * माहितीचे विश्लेषण :-

१] एकूण ६० विद्यार्थ्यांवर हा उपक्रम घेण्यात आला.
२] नियमित उपस्थिती राहिली. प्रत्येकाला संधी.. प्रत्येकाच्या कल्पनाला वाव ..
३]आठवड्यातून एक दिवस व तीन वेगवेगळ्या तासिका प्रत्येक तासिका २० विद्यार्थी ... म्हणजे तीन तास घडयाळी शाळेच्या वेळे व्यतिरिक्त.

४] उपक्रम आवडल्यामुळे व मुले गुंतल्यामुळे नवीन काहीतरी शिकतात म्हंटल्यावर सुट्टी लागल्यानंतर पुढे ही एक आठवडा सलग रोज तीन तास उपक्रम चालू होता. पालक आग्रह, मुख्याध्यापक परवानगीने.

५] विद्यार्थी उत्तरे नोंदी केली. - भावनिक स्तर, मानसिक स्तर, सामाजिक स्थिति, बौद्धिक व कौटुंबिक स्थिति वर आधारित.

६] कल्पना विस्तार ची केलेली रचना व घेत असलेले उपक्रम यांची पडताळणी करत असताना किंवा कार्यवाही करताना नवीन काही सुचले तर तेही त्याचा समावेश त्यात केला..

७] अध्यापन करताना पूर्ण स्वातंत्र्य घेतले त्यामुळे मला वाटेल तसे नवोपक्रमाची उद्दिष्ट्ये व ध्येय सातत्याने बदलत राहिली.. कारण कल्पना करताना मुले आपल्या विचाराच्या पुढे जात होती त्यामुळे नवोपक्रमात बदल करावे लागत..

## नवोपक्रमाची यशस्वीता व फलनिष्पत्ति

१] मुले वर्गात रमू लागली.

२] मुले प्रत्येक गोष्टीचे निरीक्षण करू लागली.

३] मुले प्रश्न विचारू लागली.

४] मुले एकमेकांशी संवाद साधू लागली.

५] मुले फक्त स्क्रीन न पाहता त्यावर विचार करू लागली.

६] मुलांच्या मनातील कल्पना बाहेर येवू लागल्या.

७] मुलांच्यातील बालसुलभ जिज्ञासू वृत्ती बहरली.

८] मुलांना अंदाज करता येवू लागला.

९] मुले पूर्ण वाक्यात लवकर बोलू लागली.

१०] मुले अडचण न सांगता मार्ग सुचवू लागली.

११] मुलांना कल्पना सुचू लागल्या.

१२] मुले गोष्ट पूर्ण करू लागली.

१३] मुलांना आनंद मिळाला. मुले रममाण झाली.

१४] मुलांचा पालकांशी संवाद वाढला.पालकांचा मुलांशी संवाद वाढला.

१५] मुले स्वयं शिक्षणाकडे वळू लागली. प्रत्येक चित्रात कल्पना करू लागले.

१६] शाळेत येण्याची ओढ निर्माण झाली. उत्तम अध्यापन झाल्यामुळे प्रत्यक्ष बाईना बघायचे आहे.

१७] मुलांना अभ्यास का करायचा? शाळेत का जायचे? या प्रश्नाची उत्तरे स्वत: शोधता आली.

१८] सर्व मुले एकमेकांचे ऐकू लागली. विचारांची देवाण घेवाण छोट्या स्वरूपात का होईना सुरू झाली.

१९] एखादे चित्र दिसले की त्यातील चित्रांचा संवाद मांडू लागली.

२०] चित्रातील किंवा गोष्टीतील घटना कल्पना मांडू लागली.

२१] पालकांना हि अध्यापन पद्धती आवडली.

२२] सहकारी शिक्षक त्यांच्या अध्यापनात कल्पना विस्तार करू लागले.

## समारोप

अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी व मुलांबाबत जाणवलेल्या काही अडचणीतून सुरू झालेला हा उपक्रम मुलांना एक नवी दृष्टी देणारा ठरला. नवीन पिढीतील कल्पक मुलांच्या कल्पनाशक्तीला पंख लावण्याचे भाग्य मला 'माझी कल्पना' या उपक्रमाद्वारे मिळाले. पालकांच्या प्रतिक्रियांमधून मुलांचा आनंद, घरी छोट्या छोट्या गोष्टीत त्यांनी विचारलेले प्रश्न यामधून आमची हि छोटी छोटी मुले आता एक चांगला विद्यार्थी होण्यास सज्ज झाली आहेत असे वाटले. विद्यार्थ्यांच्या बोबड्या बोलांना व विचारलेल्या प्रशांना योग्य दिशा देण्याचे कार्य थोड्या प्रमाणात झाले. विद्यार्थ्यांना व्यक्त होण्याचे धाडस यामधून मी देवू शकले. त्यांची बालमने कोरोना काळात भीतीतून काढून मी कल्पना विश्वात, कल्पना विश्वातून वास्तवात, उद्याच्या स्वप्नात रमवू शकले याचा आनंद झाला. विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लावू शकले, मला त्यांच्या विचार प्रक्रियेचा अभ्यास करता आला ज्याचा उपयोग मला हि मुले विकसित करण्यासाठी पुढे हि नक्की होईल. 'माझी कल्पना' यशस्वी झाली असे पालकांच्या प्रतिक्रियेतून व मुलांच्या वागण्यातून जाणवले.

मुलांना आता कल्पना सुचू लागली 'माझी कल्पना' आता त्यांची कल्पना झाली. या कल्पनेची भरारी मात्र अशीच अखंड उंच जात राहील.

नवोपक्रम स्पर्धेच्या माध्यमातून 'माझी कल्पना' हा छोटासा उपक्रम सर्वांसमोर सादर करताना अत्यंत आनंद होत आहे. या माध्यमातून माझा हा प्रयत्न / उपक्रम सर्वांसमोर जाण्यास मदत होईल.

**संदर्भ -**

**१] नवोपक्रम रचना - स्वत:**

**२] माधुरी पुरंदरे - लिहावे नेटके मधील लेखातून प्रेरणा**